राज्यकर सहआयुक्त, (मुख्यालय-2)
केबिन न. F-17, सातवा मजला,
नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन,
माझगाव, मुंबई. 400 010

प्रति,
राज्यकर सहआयुक्त
महाविकास, वस्तू व सेवा कर विभाग
माझगाव, मुंबई. 400 010

क्र. रा.आ.का./आ.अ./सेवा करार/जाहिरात/26-27/ब- 292 मुंबई, दि. 20/04/2026.

**विषय :- जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास सादर करण्यात येते की, राज्यकर आयुक्त कार्यालय यांच्या आस्थापनेवरील कार्यालयात सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षक यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्यासंदर्भातील जाहिरात प्रसिद्ध करावयाची असल्याने सदर जाहिरात वस्तू व सेवा कर विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

सोबत :- जाहिरातीचा नमुना.

(राजेंद्र मो. टिळेकर)
राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय 02)
राज्यकर आयुक्त कार्यालय
माझगाव, मुंबई

DC patil

राज्यकर सहआयुक्त (महाविकास)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
28/4/26
आवक क्र. 745
वि.नि./लिपीक

# वस्तू व सेवाकर कार्यालय, राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-02)
## सातवा मजला, नवीन इमारत, माझगाव, मुंबई
## सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षक यांची करार पद्धतीने नियुक्ती

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीबीई 1525/ प्र.क्र.37/आस्थामं (का.13), दि. 10.06.2025 मधील तरतुदीनुसार या विभागातील प्रलंबित कामाचा निपटारा करण्यासाठी विधीविषयक, मेळजुळवणी विषयक तसेच इतर अनुषंगिक कामांचा अनुभव असलेले राज्यकर निरीक्षक या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या एकूण 05 सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षकांच्या सेवा राज्यकर आयुक्त कार्यालय, माझगाव,मुंबई यांच्या आस्थापनेवरील कार्यालयांकरिता करार पद्धतीने घेण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्राप्त अर्जांमधून पात्र उमेदवारांची निवड करून नामिकासुची तयार करण्यात येईल. सदर उमेदवारांमधून योग्य उमेदवारीची नेमणूक सामान्य प्रशासन विभाग क्र. सीबीई 1525/ प्र.क्र.37/आस्थामं (का.13), दि. 10.06.2025 या शासन निर्णयामधील अटी व शर्तींच्या अधिन राहून करार पद्धतीने करण्यात येईल.

| सर्वसाधारण अटी व शर्ती | आवेदन पत्र |
|---|---|
| 1. उपरोक्त नमूद केलेल्या सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षक यांना विधीविषयक, मेळजुळवणी विषयक विवक्षित कामकाजाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असावा.<br>2. सदर अर्जदार सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षक यांच्या विरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी.<br>3. अर्जदार मानसिक, शारिरिक व आरोग्यदृष्ट्या सक्षम असावा तसेच करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.<br>4. वित्तलब्धी - पात्र उमेदवारांची नेमणूक करताना सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. सीबीई 1525/प्र.क्र.37/आस्थामं (का.13), दि. 10.06.2025 मधील अटी व शर्तींनुसार त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल, आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त 3 वर्ष) कायम राहील.<br>5. उपरोक्त नमुद केलेल्या विवक्षित कामांचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.<br>6. आवश्यकता भासल्यास उमेदवारांची निवड करण्यासाठी मुलाखत घेतली जाईल.<br>7. नामिकासुचीनुसार नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीनंतर त्याच्या कामाबाबत नियंत्रक अधिकारी समाधानी नसेल तर अशा नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवा तात्काळ प्रभावाने रद्द करण्याबाबतचे अधिकार राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-2), मुंबई यांना राहतील.<br><br>वरील प्रमाणे पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षक **यांनी आस्थापना अधिकारी, राज्यकर आयुक्त कार्यालय, ए-5, जूनी इमारत, 6 वा मजला, वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव, मुंबई** यांच्याकडे जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसांच्या आत विहित नमुन्यातील अर्ज सादर करावेत.<br><br>सही/-<br>राज्यकर सहआयुक्त, (मुख्यालय-2)<br>वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव, मुंबई | 1. उमेदवाराचे संपूर्ण नाव<br>2. जन्म तारीख<br>3. संपर्कासाठीचा पत्ता<br>4. भ्रमणध्वनी क्रमांक<br>5. ई-मेल<br>6. सेवानिवृत्त होताना धारण केलेले पद<br>7. सेवानिवृत्तीचा दिनांक<br>8. सेवानिवृत्तीचे कार्यालय<br>9. सेवानिवृत्तीवेळची वेतनश्रेणी<br>10. सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या तीन नेमणुका<br>11. सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या पाच वर्षातील गोपनीय अहवालाची प्रतवारी<br>12. शैक्षणिक अर्हता<br>13. संगणकीय ज्ञान<br>14. विभागीय चौकशी प्रलंबित आहे काय असल्यास विवरण द्यावे<br>15. कार्यालयामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (100 शब्दांमध्ये)<br><br>स्वाक्षरी<br>दिनांक |